आरोपीच्या वकीलांनी नि.क्र.१९ कडे अर्ज देऊन आरोपीच्या गैरहजरीत प्रकरण चालवण्याची विनंती केली. सदरचा अर्ज आरोपीची ओळख भविष्यात आव्हानीत करणार नाही या अटीवर मंजुर करण्यात आली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – राजकुमार विश्वंभर देशमुख,

वय – ५७ वर्षे, व्यवसाय–नोकरी मंडळाअधिकारी, निलंगा

राहणार – रा.निलंग, ता.निलंगा, जि. लातूर

मी आरोपीला ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही. दि.१७/०५/२०२१ रोजी मी आणि तलाठी पोलीस स्टेशनच्या मागील बाजुस स्टार फंक्शन हॉलच्या येथे गेलो असता अवैध ३० ब्रास वाळू साठा मिळून आला. त्यानंतर दि.१८/०५/२०२१ रोजी वाळु साठयाच्या ठिकाणी जाऊन पंचनामा केला. पंचनाम्यावर माझी सही आहे. सदरचा पंचनामा नि.क्र.२१ कडे दाखल आहे. पंचनामा झाल्यानंतर दि.१४/०६/२०२१ रोजी तहसीलदार यांनी लिलावाची नोटीस काढली व त्याप्रमाणे दि.२४/०६/२०२१ रोजी वाळुचा लिलाव झाला. लिलावात सगळयात जास्त बोली लावून वाळू आरोपी रियाज याने घेतला. आरोपीने एकूण रक्कम रु.७८,१००/– रुपयाची बोली घेतली. आरोपीने पैसे भरले नाहीत. आम्ही घटनास्थळी गेलो. तेथे वाळू मिळून आली नाही. त्यामुळे ती आरोपीनेच नेली. आरोपीने ती वाळू चोरुन नेली.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. टी.व्ही.पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

०२. वाळू जप्त केली तेव्हा तेथे गार्ड किंवा तहसीलचे कर्मचारी नव्हते. त्यावेळी मी, तलाठी व लदाफ होते. जप्त केलेली वाळू होती. बोलीच्या वेळी आरोपी व लदाफ याने बोली लावल्याबाबतची सही त्यावर घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने वाळू चोरी केल्याचे मी प्रत्यक्ष पाहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरापीने वाहू चोरुन नेली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फंक्शन हॉलमध्ये कोणत्याही प्रकारची वाळू जप्त

करुन ठेवली नाही किंवा त्याचा पंचनामा देखील केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे गेलोच नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.10.13 17:45:23 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–१३/१०/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा